दि. 11/2/2017
दै. लोकसत्ता

# 'अंगभूत कौशल्यांचा महिलांनी विकास करावा'

प्रतिनिधी, कोल्हापूर

जगाचं नेतृत्व करण्याची क्षमता महिलांमध्ये आहे. कुठलंही काम करताना पारदर्शकता आणि सुसंवादाचे भान ठेवून आपल्यातील अंगभूत कौशल्यांचा विकास करा. यासाठी तत्त्वांशी तडजोड करु नका, असा सल्ला रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नर उषा थोरात यांनी दिला.

ताराराणी विद्यापीठाच्या वतीने कै. डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त भद्रकाली ताराराणी पुरस्कार समारंभाचे आयोजन व्ही.टी. पाटील सभागृहात शनिवारी करण्यात आले होते. या वेळी उषा थोरात यांना ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन.डी. पाटील यांच्या हस्ते ताराराणी भद्रकाली पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र आणि ५१ हजार रुपयांचा धनादेश असे पुरस्काराचे स्वरुप होते. या सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या.

डॉ. एन.डी. पाटील म्हणाले,की भारतात वाढत चालेली आर्थिक विषमता आणि भांडवलदारांची मुजोरी पाहून इंदिरा गांधी यांनी त्या वेळी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. ती त्यांची दूरदृष्टी होती. पण सध्या बँकींग क्षेत्र खूपच संवेदनशील झाले आहे. अशा क्षेत्रात मोठ्या धाडसाने उषाताईंनी काम केले आहे. या क्षेत्रातील त्यांचे काम नक्कीच नेंकदार आणि उल्लेखनीय आहे, अशा शब्दात त्यांनी उषा थोरांतांचा गौरव केला.

डॉ. यशवंत थोरात म्हणाले,की दुसऱ्या राज्यातील, निराळ्या पंथातील असूनही उषाने नोकरी आणि घर या दोन्ही जबाबदाऱ्या नेटाने सांभाळल्या. पण हे करताना आपल्या तत्त्वांना मात्र कधीही मुरड घातली नाही. अनेक खाजगी क्षेत्रातील मोठ्या कंपन्यांची पदे तिने नाकारली.

कॅन्सर, एड्स, पर्यावरण अशा सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचं विश्वस्त पद मात्र तिने कुठल्याही अपेक्षेशिवाय स्वीकारलं. त्यामुळे हा पुरस्कार एका अधिकारी स्त्रीचा नसून एका चांगल्या स्त्रीचा आहे, अशा हृद्य भावना व्यक्त केल्या.

प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. प्रा. डॉ. सुजय पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सूत्रसंचालन पौर्णिमा मंडलिक यांनी केले. आभार अंजली साठे यांनी मानले. या प्रसंगी ए.आर. पर्वते, एस.एन. पवार, प्राजक्त पाटील, डी.आर. मुळे, इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. जे.एफ. पाटील आदी उपस्थित होते.